# गोष्ट महाराज शिकारीला गेल्यानंतरची

महाराज शिकारीत असताना एक पारधी मारलेल्या सश्याच्या कानाला धरून दूर उभा राहीलेला महाराजांना दिसला. महाराजांनी त्याला हुजऱ्याकडून पुढं बोलावून घेतलं, पारधी म्हणाला, 'म्हाराजा, तुझ्यासाठी मी ह्यो ससा मारून आणलाय. याचं कोरड्यास करुन जेव.' हुजऱ्याकडं तो ससा देऊन आपल्या ताटात वाढण्यास महाराजांनी सांगितलं. दूपारी महाराजांच्यासह सगळे जण जेवायला बसले.

इतक्यात महाराजांना त्या पारध्याची आठवण झाली. तो कुठं दिसना म्हणून त्याला शोधून आणायला माणसं पाठवली. पारध्याला शोधून त्याला महाराजांकडं आणण्यात आलं.

महाराज पारध्याकडे पहात हुजऱ्यांना म्हणाले, ‘‘याला पान करून जेवायला बसवा."

इतक्यात एक सोवळेकरी म्हणाला, ‘‘महाराज याला कोठे बसवू? त्या झाडाखाली ?"

महाराज म्हणाले," याचंच अन्न मी खात आहे आणि त्याला झाडाखाली बसवू का म्हणून काय विचारतोस? माझ्या शेजारी बसव."

त्या दिवशी एक पारधी छत्रपती शाहू महाराजांच्या शेजारी बसून जेवला.

महाराजांनी स्वत:च्या वागण्यातून जातिभेद मिटवण्याची सुरुवात केली.

## गोष्ट जातीतून बाहेर काढणाऱ्यांची

१९०५ च्या जुलै महिन्यात महाराज नव्या राजवाड्यातून आपल्या फोर्ड मोटारीतून बाहेर पडले. गाडी चालवायला लिंगायत समाजाचा तरुण पोऱ्या होता. काही अंतरावर मोटारगाडीनं रस्ता सोडला आणि शेतवडीच्या तुंबलेल्या चिखलाच्या डबऱ्यात पडली. महाराज खाली पडले ते थेट चिखलात.

चिखलानं महाराज राड झाले. क्षणात संताप अनावर झाला आणि या संतापातच महाराज *"घातलस मला खड्डूयात?"* असं म्हणत त्या तरूण मुलाच्या पाठीवर चपलेनी तडाखा दिला. महाराज स्वतः ड्रायव्हिंग करत निघून गेले.

दूसऱ्या दिवशी महाराजांच्या गाडीवर नवीन ड्रायव्हर होता. आपल्याला आलेल्या क्षणिक रागातून त्या मुलाला मारल्याचं महाराजांना वाईट वाटतं होतं. तो दिसला नाही, तेव्हा महाराजांनी त्या पोऱ्याला बोलवून घेतलं, तर तो रडत समोर आला.

महाराज म्हणाले, “कारं का रडतूयस ?"

पोरगा म्हणाला, “महाराज तुम्ही मारलं त्याचं मला कायबी वाईट वाटत न्हाय. पण लिंगायत समाजात चपलेचा मार खाल्ला की तोंड बघत नाईत. जातीत घेत नाईत. आता मी काय करावं?"

महाराजांनी लागलीच म्हैसकर फौजदारांना बोलावून घेतलं आणि फौजदारांना म्हणाले, या पोराचे नातेवाईक आणि जातीचे पुढारी यांना आज सायंकाळी पापाच्या तिकटीसमोर जमा करा. सोबत शेणकाल्यानं भरलेली बादली आणि फाटके पायताण आणा.

संध्याकाळी लिंगायत जातीची ७०-७५ पुढारी मंडळी पापाच्या तिकटीला जमली. महाराज आले. महाराजांच्या सुचनेनुसार जमलेल्या पुढाऱ्यांना पायतानाचा एक एक तडाखा मारण्यात आला. जमलेले पुढारी म्हणाले, "महाराज आम्ही काय केलं? आम्हाला अशी शिक्षा का?"

तेव्हा महाराज म्हणाले, “रागाच्या भरात आम्ही ड्रायव्हर पोरावर चप्पल उगारली. त्याची शिक्षा त्याला जातीतून बाहेर काढायची देता. आता सगळयांचीच जात बिघडली आहे. आता तुम्ही काय करणार?

आपली चूक कळताच सर्व पुढाऱ्याना आपली चूक कळली आणि त्यांनी महाराजांची माफी मागितली. महाराजांनी मोठ्या मनाने त्यांना माफ केले आणि अशा अन्यायकारक परंपरा सोडून देण्यास सांगितले.